# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of stolen property**

**Police Station** :- **Manora**

**Date of Good Work done** :- **25/06/2022**

**Brief of the work done :-**

आर्णी येथून पुणे येथे जात असलेल्या ट्रकचालकास मारहाण करून त्याच्या ताब्यातील 14 लाखांचा तीळ असलेला ट्रक घेऊन पळून जाणाऱ्या आरोपीस मानोरा पोलिसांनी ट्रकसह ताब्यात घेतले आहे.

लोकमत

## १४ लाखांचा तीळ पळविणाऱ्यास अटक

### ट्रक घेतला ताब्यात : डी.बी. पथकाची कारवाई

**फुलउमरी :** आर्णीच्या बाजारातून १४ लाखांपेक्षा अधिक किमतीचा २५८ कट्टे तिळाचा माल भरून यवत (पुणे)च्या दिशेने निघालेल्या ट्रकच्या मूळ चालकास मारहाण करणाऱ्यास तीळ आणि ट्रकसह अटक करण्यात आली. ही कारवाई डी.बी. पथकाने केली.

प्राप्त माहितीनुसार, आर्णी बाजारातून कचरूलाल ट्रेडर्सच्या माध्यमातून बोरा फुड्स प्रा.लि. या कंपनीने २५८ कट्टे तीळ ११०० रुपये प्रतिक्विंटल दराने खरेदी करून तो माल एम.एच. २६ बी.ई. ७९१७ या क्रमांकाच्या ट्रकने यवत (दौंड, पुणे) येथे पाठविला. आर्णीवरून ट्रक निघाल्यानंतर दिग्रस येथे चालक शेख हुसेन शेख रोशन याने वाहनात असलेल्या दुसऱ्या चालकास मारहाण करून खाली उतरविले आणि ट्रक घेऊन अकोल्याच्या दिशेने पळ काढला. उतरवून दिलेल्या चालकाने गाडी मालकास घटनेची माहिती दिली. दरम्यान, शेख सलीम शेख रफीक यांनी डी.बी. पथकाचे पोलीस कर्मचारी बालाजी पाटील यांना भ्रमणध्वनीवरून माहिती दिली. त्यानंतर दिग्रस चौकात संबंधित ट्रक अडवून चालकास अटक करण्यात आली. ट्रकमधील तीळ आजच्या बाजारभावानुसार १४ लाख ३४ हजार ८८४ रुपये किमतीचा असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या कारवाईत प्रभारी ठाणेदार महेश कुचेकर, डी.बी. पथकाचे मयुरेश तिवारी, बालाजी पाटील व बन्सी चव्हाण यांनी सहभाग नोंदविला.